दिनांक ०४/११/२०२०

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक सुरेश गंगाराम सदावर्ते, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद यांनी ४०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | सुरेश गंगाराम सदावर्ते, वय ५१ वर्ष, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद<br>रा. कासलीवाल भाग्योदय, शिवाजीनगर रेल्वे गेट जवळ, देवळाई चौक, शिवाजीनगर, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. महादेव ढाकणे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ४०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या वडिलांच्या नावे असलेली शेत जमीन वाटणीपत्राव्दारे तक्रारदार व त्यांचा भाऊ यांचे नावे करण्याच्या सुनावणी आदेशाची प्रत देणेसाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | तहसील कार्यालय फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे वडिलांचे नावे असलेली शेत जमीन वाटणीपत्राव्दारे तक्रारदार व त्यांचा भाऊ यांचे नावे करण्याच्या सुनावणी आदेशाची प्रत देण्यासाठी सुरेश सदावर्ते, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद हे ५०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, सुरेश सदावर्ते, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडी अंती ४०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दिनांक ०४/११/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, सुरेश गंगाराम सदावर्ते, वय ५१ वर्ष, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि. औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन ४०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. महादेव ढाकणे यांनी केली आहे. त्यांना पोशि मिलींद इपर, अविल जाधव, राजेंद्र सिनकर, चापोशि देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

04/11/2020
(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.